**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२६/प्र.क्र.१०८/ई-१६०१२९३/तांशि-४**
**मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.**
**दिनांक: १७ नोव्हेंबर, २०२६.**

**संदर्भ** :-१. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनईपी-२०२४/ई-१०८६३८२/विशि-३, दि.२२.०४.२०२५.
२. मा. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखालील सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या दि.२४.०३.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये उच्च शिक्षणातील अध्ययनामध्ये Apprenticeship चे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) राबविण्याबाबत दि. २४.०३.२०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना स्वीकारण्यास संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून, त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व पात्र ठरणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमध्ये सदर कार्यक्रम शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ पासून लागू करण्यात आला आहे.

२. "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" व "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" AEDP अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्याचा निर्णय अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या दिनांक २४.०३.२०२६ च्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. तसेच, विकसित महाराष्ट्र २०४७ च्या Action Plan मध्ये AEDP कार्यक्रमाचे बळकटीकरण करण्याचा समावेश आहे.त्यानुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विशि-३ कार्यासनाने सादर केलेल्या AEDP अभ्यासक्रमांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP) कार्यक्रमांतर्गत शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित/प्रवेशित होणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या योजनांचा लाभ, सदर योजनांबाबतच्या प्रचलित शासन निर्णयांमध्ये विहित केलेल्या पात्रता अटी, उत्पन्न मर्यादा, जात प्रवर्गनिहाय निकष व अन्य शर्तींच्या अधीन राहून, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी महा-डीबीटी (MahaDBT) संकेतस्थळावर विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

३. प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद अभ्यासक्रमांव्यतिरिक्त भविष्यात राज्यातील विद्यापीठांमार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांस अनुसरुन सुरु करण्यात येणाऱ्या अतिरिक्त AEDP अभ्यासक्रमांबाबत, संबंधित संचालनालयाने (उच्च शिक्षण संचालनालय/तंत्रशिक्षण संचालनालय/कला संचालनालय) सादर केलेल्या प्रस्तावांची उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या स्तरावर पडताळणी करून, स्वतंत्रपणे शासन मान्यता घेण्यात यावी.

४. परिशिष्ट-अ मध्ये नमूद अभ्यासक्रमांचे महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी मॅपिंग करण्याची कार्यवाही महा-आयटी व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत संबंधित संचालनालय यांनी प्रचलित कार्यपद्धतीने तातडीने करावी.

५. सदर योजनेंतर्गत होणारा खर्च संबंधित शिष्यवृत्ती योजनेच्या विद्यमान लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा.

६. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभाग व शिष्यवृत्ती राबविणारे संबधित विभाग यांनी “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना” व “डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना” त्यांच्या अखत्यारीतील राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या AEDP च्या अभ्यासक्रमांना अनुज्ञेय करण्याचा निर्णय त्यांचे स्तरावर घेऊन याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. तसेच, अभ्यासक्रम महा-डीबीटी पोर्टलवर मॅपिंग करण्याबाबतची आवश्यक कार्यवाही संबंधित विभागांनी त्यांच्या स्तरावरुन करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१११७१२५१२८५६०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL RAMCHANDRA CHAURE

Digitally signed by ANIL RAMCHANDRA CHAURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=6702D541C3481612BAD5DC130EEB99A9B97C00C39D6C82D68BCB086B1FA08698, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=442E1293BBCF028938E3D674F26AB93E80F0C579F8D94DD6EF3DB6A124829D69, cn=ANIL RAMCHANDRA CHAURE
Date: 2026.11.17 12:53:11 +05'30'

**(अनिल चौरे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्यमंत्री (अर्थ व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास/ आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२०. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२१. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२७. उप सचिव (तांशि/मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. सर्व कक्ष अधिकारी / अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३०. निवडनस्ती/तांशि-४.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२६/प्र.क्र.१०८/ई-१६०१२९३/तांशि-४,
दि.१७.११.२०२६ सोबतचे परिशिष्ट-अ

| अ.क्र. | AEDP अभ्यासक्रम |
|---|---|
| 1. | B.Tech in Artificial Intelligence |
| 2. | B.Tech in Data Science |
| 3. | B.Tech in Computer Engineering |
| 4. | B.Tech in Electronics and Communication |
| 5. | B.Tech in Information Technology |
| 6. | B.Tech in Computer Science and Technology |
| 7. | B.Sc. Hospitality Studies (Offered by 49 colleges) |
| 8. | B.Voc. in Retail Management |
| 9. | B.Sc. Pharmaceutical Manufacturing and Quality |
| 10. | B.Sc. Blockchain Technology |
| 11. | B.Com. (Business Administration) |
| 12. | B.A. Culinary Art |
| 13. | B.Sc. Hospitality |
| 14. | B.Com. (BFSI) |
| 15. | B.Com. (Logistics) |
| 16. | BBA (Logistics) |
| 17. | M.A. (German Studies) |
| 18. | B.A. (Hons.) in German Studies |
| 19. | B.A. (German Studies) |
| 20. | B.Sc. Media Communication |
| 21. | B.Sc. Animation and VFX |
| 22. | B.Sc. Film and TV Production |
| 23. | B.Sc. Digital Marketing and Advertising |
| 24. | BBA Event Management |
| 25. | B.Com. (E-Commerce Operation) |
| 26. | B.Com. (Retail Operations) |
| 27. | B.Com. (Banking Financial Services and Insurance (BFSi)) |
| 28. | B.A. Social Science - AEDP |
| 29. | B.Sc. (Aeronautics) |
| 30. | B.Sc. (Biomedical Instrumentation) |
| 31. | Bachelor of Interior Design |
| 32. | BMS (Customs Clearance & Freight Forwarding) |
| 33. | BMS (Retail Management) |
| 34. | BMS (Travel & Tourism Management) |
| 35. | B.Sc. (Psychological Health & Behavioral Science) |
| 36. | B.Des. (Textile Designing) |
| 37. | B.Des. (Fashion Designing) |
| 38. | B.A. (Advertising & Communication Design) |
| 39. | Bachelor of Sports Management |
| 40. | Bachelor of Sports Science |

| | |
|---|---|
| 41. | BMS (Capital Markets) |
| 42. | BBA (Event Management & Public Relations) |
| 43. | B.Sc. Paint Technology |
| 44. | B.Sc. (Artificial Intelligence And Machine Learning) |
| 45. | B.Sc. (Applied Biology) |
| 46. | B.Sc. Statistics with Data Analytics |
| 47. | BCA Honors AEDP |
| 48. | B.Sc. Microbiology |
| 49. | B.Sc. Data Science (Apprentice Embedded Degree Program - AEDP) |
| 50. | B.Sc. Electronics |
| 51. | B.Com. (Retail Operations Management) |
| 52. | B.Sc. (Bio-Technology) |
| 53. | B.Sc. Food Technology |
| 54. | B.Sc. Printing & Packaging Technology |
| 55. | Bachelor of Vocation Automobile |
| 56. | Bachelor of Vocation Industrial Automation |
| 57. | B.Sc. Mathematics (Financial & Actuarial Mathematics) |
| 58. | B.Sc. Mathematics (SAP-ERP) |
| 59. | B.Sc. Mathematics (Data Science & Artificial Intelligence) |
| 60. | B.Sc. Cyber Security |
| 61. | B.Sc. Cyber Science |
| 62. | Bachelor of Science (Electronics) |
| 63. | B.Sc. AI and IoT |
| 64. | Bachelor of Science (Digital Marketing and AI) |
| 65. | Bachelor of Science (Cyber Security and Digital Forensic) |
| 66. | Bachelor of Science (Semiconductor Science and Technology) |
| 67. | Bachelor of Science (Biochemistry) |
| 68. | B.Sc. In Food, Nutrition and Dietetics |
| 69. | B.Sc. Textiles & Fashion Designing |
| 70. | B.Sc. Early Childhood Care & Education |
| 71. | B.Sc. Geoinformatics |
| 72. | B.Com. (Retail Management) |
| 73. | B.Sc. Textile Design Technology |
| 74. | B.Sc. (Honor) Semiconductor Materials & Devices |
| 75. | B.Sc. Drone Science |
| 76. | BBA Facilities and Services Management |
| 77. | B.Com. Banking and Taxation |
| 78. | B.Sc. Sugar and Alcohol Technology |
| 79. | B.Sc. Medical Laboratory Technology |
| 80. | B.Sc. Data Science |
| 81. | B.Sc. Hospitality Studies |
| 82. | B.A. Social Science (AEDP) |
| 83. | B.A. Hotel Management and Catering |
| 84. | M.Sc. Environmental Science |

| | |
|---|---|
| 85. | Bachelor of Commerce (Corporate Administration) |
| 86. | Bachelor of Science (AI & ML) |
| 87. | Bachelor of Commerce (BFSI) |
| 88. | Bachelor of Arts (Film Making) |
| 89. | Bachelor of Arts (Sports) |
| 90. | Master of Design |
| 91. | B.A. (Culinary Arts) (Offered by 7 colleges) |
| 92. | B.Sc. (Information Technology) |
| 93. | B.Com. in Management Studies |
| 94. | Bachelor of Management Studies BMS (Under AICTE) |
| 95. | B.Com. (Accountancy Finance and Insurance) (Under CRISP) |
| 96. | Bachelor of Commerce in Computer Application |
| 97. | Bachelor of Commerce in Banking and Finance |
| 98. | Bachelor of Commerce in Financial Accounting and Auditing |
| 99. | B.V.A. (Drawing and Painting) |
| 100. | B.A. (Music) |
| 101. | B.A. (Languages viz. English, Marathi, Hindi, Sanskrit and Gujarati) |
| 102. | B.A. (Psychology) |
| 103. | B.A. (Sociology) |
| 104. | B.A. (Economics) |
| 105. | Bachelor of Commerce in Tourism Management |
| 106. | B.A. (Economics) (English, Marathi and Gujarati Medium) |
| 107. | B.Sc. (Artificial Intelligence) |
| 108. | B.A. (Mass Communication) |
| 109. | B.Com. (Travel and Tourism) |
| 110. | B.Sc. Environmental Science |
| 111. | B.A. (Multimedia Film Art) |
| 112. | B.A. (Advertising Communication Design) |
| 113. | B.Voc. in Manufacturing Technology |
| 114. | B.A. Psychology (Honours) |
| 115. | B.A. Humanities (Civil Services) |
| 116. | B.Sc. Block Chain Technology |
| 117. | Bachelor of Commerce in Accountancy and Finance |
| 118. | B.Com. in Accountancy, Finance & Insurance |
| 119. | B.Sc. (H) Electronics |
| 120. | B.Com. E-Commerce Operation |
| 121. | B.Sc. Data Science and Analytics |
| 122. | Bachelor of Computer Applications Hons AEDP |
| 123. | B.A. Media and Mass Communication |
| 124. | B.Com. (Banking Financial Services and Insurance) AEDP |

***

ANIL RAMCHANDRA CHAURE

Digitally signed by ANIL RAMCHANDRA CHAURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=6702D541C3481612BAD5DC130EEB99A9B97C00C39D6C82D68BCB086B1FA08698, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=442E1293BBCF02893BE3D674F26AB93E80F0C579F8D94DD6EF3DB6A1248291D69, cn=ANIL RAMCHANDRA CHAURE
Date: 2026.11.17 12:53:31 +05'30'